# Maharashtra Jeevan Pradhikaran (MJP)

## INFORMATION HANDOUT FOR ONLINE EXAMINATION FOR RECRUITMENT OF VARIOUS POST

This handout contains details pertaining to various aspects of the online exam you are going to undertake and important instructions about related matters. You are advised to study the handout carefully as it will help you in preparing for the examination.

The online examination will comprise the following objective type multiple choice tests as stated below:

**Structure of the test for the post of (1) Internal Audit Officer/Senior Accounts Officer (Gr. A), (2) Accounts Officer (Gr. B), (3) Assistant Accounts Officer (Gr. B), (4) Deputy Accountant (Gr. C), (5) Jr. Engineer (Civil) (Gr. B) & (6) Jr. Engineer (Mechanical) (Gr. B)**

| Sr. No. | Name of the Test | No. of Questions | Max. Marks | Version | Duration |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | 10 | 20 | Marathi | |
| 2 | English | 10 | 20 | English | |
| 3 | General Knowledge | 15 | 30 | Marathi & English | 120 Minutes |
| 4 | Intellectual Test | 15 | 30 | | |
| 5 | Technical Knowledge | 50 | 100 | English | |
| | Total | **100** | **200** | | **120 Minutes** |

All questions will carry equal marks.

**Structure of the test for the post of (7) Higher Grade Stenographer (Gr. B) and (8) Lower Grade Stenographer (Gr.C)**

| Sr. No. | Name of the Test | No. of Questions | Max. Marks | Version | Duration |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | 15 | 30 | Marathi | |
| 2 | English | 15 | 30 | English | 75 Minutes |
| 3 | General Knowledge | 15 | 30 | Marathi & English | |
| 4 | Intellectual Test | 15 | 30 | | |
| | Total | **60** | **120** | | **75 Minutes** |

All questions will carry equal marks.

**Structure of the test for the post of (9) Junior Clerk/Clerk-cum-Typist (Gr. C) & (10) Asst. Store Keeper (Gr. C)**

| Sr. No. | Name of the Test | No. of Questions | Max. Marks | Version | Duration |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | 25 | 50 | Marathi | |
| 2 | English | 25 | 50 | English | 120 Minutes |
| 3 | General Knowledge | 25 | 50 | Marathi & English | |
| 4 | Intellectual Test | 25 | 50 | | |
| | Total | **100** | **200** | | **120 Minutes** |

All questions will carry equal marks.

**Structure of the test for the post of Technical Assistant Civil (Gr. C)**

| Sr. No. | Name of the Test | No. of Questions | Max. Marks | Version | Duration |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | 10 | 20 | Marathi | |
| 2 | English | 10 | 20 | English | |
| 3 | General Knowledge | 15 | 30 | Marathi & English | 120 Minutes |
| 4 | Intellectual Test | 15 | 30 | | |
| 5 | Technical Knowledge | 50 | 100 | | |
| | Total | **100** | **200** | | **120 Minutes** |

All questions will carry equal marks.

The time for the test is 75/120 minutes; however, you may have to be at the venue for approximately 135/180 minutes including the time required for logging in, collection of the call letters, going through the instructions etc. You can attempt any question at any point of time within the given time. All the questions will have multiple choices. Out of the five answers to a question only one will be the correct answer. **You have to select the most appropriate answer and 'mouse click' that alternative which you feel is appropriate/correct. The alternative/ option that you have clicked on will be treated as your answer to that question. There will be penalty for wrong answers marked by you. For every wrong answer marked by you, 1/4 of the marks assigned to that question will be deducted as penalty.**

**Please note that the types of questions in this handout are only illustrative and not exhaustive. In the actual examination you will find questions of a higher difficulty level on some or all of these types and also questions on the types not mentioned here.**

Some sample questions are given below.

## SAMPLE QUESTIONS

## मराठी भाषा

**प्र.1-2.** पुढील प्रत्येक प्रश्नात वाक्याचे चार भाग पाडले आहेत. व्याकरणाच्या, वाक्य रचनेच्या किवा भाषेच्या दृष्टीने वाक्य सदोष असल्यास, कोणत्या भागात दोष आहे ते ठरवून त्या भागाचा क्रमांक उत्तर म्हणून द्या. वाक्य निर्दोष / बिनचूक असल्यास उत्तर "(5)" द्या.

**प्र.1.** इंग्लंडमधून जन्मलेल्या (1) / कुसुमाग्रजांना शेक्सपियर म्हणतात (2) / व हिंदुस्थानात जन्मलेल्या शेक्सपियरांना (3) / कुसुमाग्रज म्हणतात (4) निर्दोष (5)

**प्र.2.** माझ्या स्मरणशक्तीनुसार (1) / माझ्या बाळपणी माझ्या वडिलांची बदली (2) / एका गलिच्छ गावी (3) / झाली आहे. (4) निर्दोष (5)

**प्र.3-4.** पुढे काही शब्दसमूह दिले आहेत. त्यांचा अर्थ सांगणारा एक शब्द दिलेल्या पर्यायातून निवडा.

**प्र.3.** स्वतःच स्वतःची सर्व कामे करणारा.

(1) स्वयंभू (2) स्वावलंबी (3) स्वयंचलित (4) स्वकष्टार्जित (5) स्वाध्यायी

**प्र.4.** कोणतेही काम करू शकणारा.

(1) बहुश्रुत (2) हुषार (3) चलाख (4) हरहुन्नरी (5) डोकेबाज

## ENGLISH

**Q.1.** Read the sentence to find out whether there is any grammatical or idiomatic error in it. The error, if any, will be in one part of the sentence. That part is the answer. If there is no error, the answer is 'No error'. (Ignore the errors of punctuation, if any).

The regaining of freedom (1) / as we well know has given rise for (2) / many dormant issues (3) / and conflicts in our society. (4) No error (5)

**Q.2.** **Directions :** In each of the following questions, select from amongst the five alternatives, the word most opposite in meaning of the word given in capitals.

INADVERTENT
(1) adequate (2) available (3) sluggish (4) negligent (5) intentional

**Q.3.** Pick out from the words given below this sentence the word which would complete the sentence correctly and meaningfully.

He wants me to look ____ his garden during his absence.
(1) at (2) over (3) after (4) into (5) from

**Q.4.** **Direction :** In each of the following questions, select from amongst the five alternatives, the word nearest in meaning to the word given in capitals.

**Q.4.** LETHAL (1) light (2) dangerous (3) deadly
(4) cruel (5) thoughtless

## GENERAL KNOWLEDGE

**Q.1.** Which country won the "Cricket World-Cup 2007" ?
(1) South Africa (2) Sri Lanka (3) England
(4) New Zealand (5) Other than those given as options

**Q.2.** Which of the following crops is not cultivated in Maharashtra ?
(1) Jowar (2) Wheat (3) Jute (4) Cotton (5) Tobacco

**Q.3.** Kumbh Mela is organised In which of the following cities ?
(1) Pune (2) Ratnagiri (3) Nashik (4) Pandharpur (5) Kolhapur

**Q.4.** Which of the following states does **NOT** have a common border with Maharashtra ?
(1) Chhattisgarh (2) Karnataka (3) Andhra Pradesh (4) Rajasthan (5) Gujarat

## INTELLECTUAL TEST

**Q.1.** 'Foot' is related to 'Man' in the same way as 'Hoof' is related to —— ?
(1) Horse (2) Dog (3) Shoe (4) Blacksmith (5) Saddle

**Q.2.** In a row of boys, Mahesh is seventh from the left side and 18th from the right side of the row. How many boys are there in the row ?
(1) 26 (2) 25 (3) 27 (4) Cannot be determined (5) Other than those given as options

**Q.3.** Which of the following English letter groups will replace the question-mark (?) in the following **series** of letter groups ?
AB BC CD DE ? FG
(1) DF (2) DG (3) FE (4) EF (5) GF

**Q.4.** In a certain code 'A + B' means "A is the mother of B" and 'A – B' means "A is the father of B". Which of the following means "P is the grand-mother of R" ?
(1) P – Q + R (2) Q – R + P (3) P + Q – R
(4) Q + R – P (5) Other than those given as options

### TECHNICAL KNOWLEDGE

Questions in this sub-test will be relevant to the area of Specialization.

**(A) Details of the On-line Examination Pattern**

(1) The examination would be conducted on-line i.e. on a computer.

(2) The tests of General Knowledge, Intellectual Test will be Bilingual (i.e. in English & Marathi). The test of English and Technical Knowledge will be provided in English and the Test of Marathi Language will be provided in Marathi.

(3) All the questions will have multiple choices. Out of the five answers to a question only one will be the correct answer. **The candidate has to select the most appropriate answer and 'mouse click' that alternative which he/ she feels is appropriate/ correct. The alternative/ option that is clicked on will be treated as the answer to that question. Answer to any question will be considered for final evaluation, only when candidates have submitted the answers by clicking on "Save & Next" or "Mark for Review & Next".**

(4) The clock has been set at the server and the countdown timer at the top right corner of your screen will display the time remaining for you to complete the exam. When the clock runs out the exam ends by default - you are not required to end or submit your exam.

(5) The question palette at the right of screen shows one of the following status of each of the questions numbered:



You have not visited the question yet.



You have not answered the question.



You have answered the question.



You have NOT answered the question, but have marked the question for review.



The question(s) "Answered and Marked for Review" will be considered for evaluation.

The Marked for Review status simply acts as a reminder that you have set to look at the question again. *If an answer is selected for a question that is Marked for Review, the answer will be considered in the final evaluation.*

(6) To select a question to answer, you can do one of the following :

(a) Click on the question number on the question palette at the right of your screen to go to that numbered question directly. Note that using this option **does NOT save your answer** to the current question.

(b) Click on **'Save & Next'** to save answer to current question and to go to the next question in sequence.

(c) Click on **'Mark for Review and Next'** to save answer to current question, mark it for review, and to go to the next question in sequence.

(7) To select your answer, click on one of the option buttons.

(8) To change your answer, click another desired option button.

(9) To save your answer, you MUST click on **Save & Next.**

(10) To deselect a chosen answer, click on the chosen option again or click on the **Clear Response** button.

(11) To mark a question for review click on **Mark for Review & Next**. *If an answer is selected for a question that is Marked for Review, the answer will be considered in the final evaluation.*

(12) To change an answer to a question, first select the question and then click on the new answer option followed by a click on the **Save & Next** button.

**(13) Questions that are saved or marked for review after answering will ONLY be considered for evaluation.**

(14) Sections will be displayed on the top bar of the screen. Questions in a section can be viewed by clicking on the section name. The section you will view will be highlighted.

(15) After clicking the **Save & Next** button on the last question for a section, you will automatically be taken to the first question of the next section.

(16) You can move the mouse cursor over the section names to view the status of the questions for that section.

(17) You can shuffle between sections and questions anytime during the examination as per your convenience.

(18) The candidates are requested to follow the instructions of the "Test Administrator" carefully. If any candidate does not follow the instructions / rules, it would be treated as a case of misconduct/ adoption of unfair means and such a candidate would be liable for debarment from appearing for examinations for a period as decided by the MJP.

(19) The candidates may ask the Test Administrator about their doubts or questions only before the commencement of the test. No query shall be entertained after the commencement of the examination.

(20) After the expiry of 75/120 minutes, the candidates will not be able to attempt any question or check their answers. The answers of the candidate would be saved automatically by the computer system even if he/ she has not clicked the "Submit" button.

**(21) Please note :**

**(a) Candidates will not be allowed to "finally submit" unless they have exhausted the actual test time.**

**(b) Under no circumstances should a candidate click on any of the 'keyboard keys' once the exam starts as this will lock the exam.**

**[B] General Instructions:**

(1) Please note date, Reporting time and Venue address of the examination given in the call letter.

(2) You may visit the venue one day before the Online Examination to confirm the location so that you are able to report **on time** (as printed on the call letter) on the day of the examination. Late comers will not be allowed.

(3) The call letter should be brought with you to the examination venue along with your recent passport size photograph duly pasted on it. (Preferably the same photograph as was as uploaded).

(4) You must scrupulously follow the instructions of the Test Administrator and the MJP Representative at the examination venue. If you violate the instructions you will be disqualified and will be asked to leave the examination venue.

(5) No use of calculators (separate or with watch), books, note books or written notes, cell phones (with or without camera facility), or any other electronic device will be allowed during the examination.

(6) Please bring the call letter with your recent photograph affixed thereon, photocopy of the ID proof stapled with call letter and same currently valid photo identity proof in original. - **THIS IS ESSENTIAL. Please submit the call-letter along with photocopy of photo identity proof duly stapled together by handing it over to the Invigilator.** Currently valid photo identity proof may be PAN Card/ Passport/ Permanent Driving License/ Voter's Card with photograph/ Bank Passbook with photograph/ Photo Identity proof issued by a Gazetted Officer on official letterhead /Photo Identity proof issued by a People's Representative on official letterhead/Valid recent Identity Card issued by a recognised College/ University/ Aadhar/ E-aadhar card with a photograph/Employee ID in original/Bar Council Identity card with photograph. **Please Note - Ration Card and Learner's Driving License will NOT be accepted as valid ID proof for this examination.** Please note that your name as appearing on the call letter (provided by you during the process of registration) should exactly match the name as appearing on the photo identity proof. Female candidates who have changed first/last/middle name post marriage must take special note of this. If there is any mismatch between the name indicated in the Call Letter and Photo Identity Proof you will not be allowed to appear for the exam. In case of candidates who have changed their name will be allowed only if they produce Gazette notification/their marriage certificate / affidavit.

(7) Biometric data (thumb impression) and photograph will be captured at the examination venue before the start of examination. Decision of the Biometric data verification authority with regard to its status (matched or mismatched) shall be final and binding upon the candidates. Refusal to participate in the process of biometric data capturing / verification on any occasion may lead to cancellation of candidature. With regards to the same, please note the following :

(a) If fingers are coated (stamped ink/mehndi/coloured. etc.), ensure to thoroughly wash them so that coating is completely removed before the examination day.
(b) If fingers are dirty or dusty, ensure to wash them and dry them before the thumb impression (biometric) is captured.
(c) Ensure fingers of both hands are dry. If fingers are moist, wipe each finger to dry them.
(d) If the primary finger (thumb) to be captured is injured/damaged, immediately notify the concerned authority in the test centre.

(Any failure to observe these points will result in non- admittance for the examination).

(8) In order to save time on frisking (Metal Detectors will be used), the candidates are advised to follow the below mentioned dress code:

- Light clothes which cannot be used for hiding any instruments or communication devices.
- Half sleeves but not having big buttons or any badge, brooches etc. which could be used to hide the communication device, Bluetooth, camera, etc.
- Slippers, sandals and not the shoes/socks.

However, candidates coming in customary/ religious dresses and PwBD candidates should report at the centre well in advance prior to reporting time for frisking.

(9) Your responses (answers) will be analysed with other candidates to detect patterns of similarity of right and wrong answers. If in the analytical procedure adopted in this regard, it is inferred/concluded that the responses have been shared and scores obtained are not genuine/valid, your candidature may be cancelled. Any candidate who is found copying or receiving or giving assistance or engaging in any behaviour unbecoming of a candidate will not be considered for assessment. MJP may take further action against such candidates as deemed fit by it.

(10) You must bring a ball point pen with you. You are allowed to bring your own ink stamp pad (blue/black) with you. A sheet of paper will be provided which can be used for rough work or taking down the question number you

would like to review at the end of the test before submitting your answers. After the test is over you MUST hand over this sheet of paper to the Test Administrator before leaving the venue

(11) The possibility of occurrence of some problem in the administration of the examination cannot be ruled out completely which may impact test delivery and/or result from being generated. In that event, every effort will be made to rectify such problem, which may include movement of candidates, delay in test. Conduct of a re-exam is at the absolute discretion of test conducting body. Candidates will not have any claim for a re-test. Candidates not willing to move or not willing to participate in the delayed process of test delivery shall be summarily rejected from the process.

(12) Anyone found to be disclosing, publishing, reproducing, transmitting, storing or facilitating transmission and storage of test contents in any form or any information therein in whole or part thereof or by any means verbal or written, electronic or mechanical or taking away the papers supplied in the examination hall or found to be in unauthorised possession of test content is likely to be prosecuted.

(13) Instances for providing incorrect information and/or process violation by a candidate detected at any stage of the selection, process will lead to disqualification of the candidate from the selection process and he/she will not be allowed to appear in any recruitment process of MJP in the future. If such instances go undetected during the current selection process but are detected subsequently, such disqualification will take place with retrospective effect.

(14) Please note that a candidate is allowed to appear for the exam only once. In case more than one call letter has been generated, candidates are advised to appear only once, on the date and time mentioned on respective call letter. Multiple appearances in the online exam will result in cancellation of candidature.

(15) Candidates are advised to take note of “The Public Examinations (Prevention of Unfair Means) Act, 2024”.

**WISH YOU GOOD LUCK!**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP)

## विविध पदांच्या भरतीसाठी माहिती पुस्तिका

उमेदवार देणार असलेल्या ऑनलाईन परीक्षेच्या विविध पैलूंचा तपशील आणि संबंधित बाबीसंबंधात महत्वाच्या सूचना या पुस्तिकेत आहेत. परीक्षेची तयारी करण्यात मदत व्हावी म्हणून उमेदवारास या पुस्तिकेचे नीट अध्ययन करण्यास सुचविले जात आहे.

खाली दर्शविल्याप्रमाणे ऑनलाईन परीक्षेत वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या बहुपर्यायी प्रश्नावल्या असतील.

**(1) अंतर्गत लेखापरीक्षण अधिकारी/ वरिष्ठ लेखा अधिकारी (गट-अ), (2) लेखा अधिकारी (गट-ब), (3) सहाय्यक लेखा अधिकारी (गट-ब), (4) उप लेखापाल (गट-क), (5) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-ब) आणि (6) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-ब) पदांसाठी परीक्षेचे स्वरूप**

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 10 | 20 | मराठी | 120 मिनट |
| 2 | इंग्रजी | 10 | 20 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 15 | 30 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | बौद्धिक चाचणी | 15 | 30 | | |
| 5 | तांत्रिक ज्ञान | 50 | 100 | इंग्रजी | |
| | **एकूण** | **100** | **200** | | **120 मिनट** |

सर्व प्रश्नांना समान गुण असतील.

**(7) उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब) (Gr. B) आणि (8) निम्नश्रेणी लघुलेखक (गट-क) पदांसाठी परीक्षेचे स्वरूप**

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 15 | 30 | मराठी | 75 मिनट |
| 2 | इंग्रजी | 15 | 30 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 15 | 30 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | बौद्धिक चाचणी | 15 | 30 | | |
| | **एकूण** | **60** | **120** | | **75 मिनट** |

सर्व प्रश्नांना समान गुण असतील.

**(9) कनिष्ठ लिपिक/लिपिक-नि-टंकलेखक (गट-क) आणि (10) सहाय्यक भांडारपाल (गट-क) पदांसाठी परीक्षेचे स्वरूप**

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 25 | 50 | मराठी | 120 मिनट |
| 2 | इंग्रजी | 25 | 50 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 25 | 50 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | बौद्धिक चाचणी | 25 | 50 | | |
| | **एकूण** | **100** | **200** | | **120 मिनट** |

सर्व प्रश्नांना समान गुण असतील.

## स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (गट-क) पदासाठी परीक्षेचे स्वरूप

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 10 | 20 | मराठी | 120 मिनट |
| 2 | इंग्रजी | 10 | 20 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 15 | 30 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | बौद्धिक चाचणी | 15 | 30 | | |
| 5 | तांत्रिक ज्ञान | 50 | 100 | | |
| | **एकूण** | **100** | **200** | | **120 मिनट** |

सर्व प्रश्नांना समान गुण असतील.

परीक्षेसाठी 75/120 मिनटांचा अवधी आहे, तरीसुद्धा उमेदवारास परीक्षा स्थानी साधारणतः 135/180 मिनिटे असावे लागेल ज्यामध्ये नोंद होणे (logging in), प्रवेशपत्र गोळा करणे, सूचना देणे इ. साठी लागणा-या कालावधीचासुद्धा समावेश आहे. दिलेल्या कालावधीत परीक्षार्थी कोणत्याही प्रश्नावलीतील प्रश्न सोडवू शकतात. सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच उत्तरांपैकी, फक्त एकच अचूक उत्तर असेल. **उमेदवारास सर्वाधिक अचूक उत्तराची निवड करावयाची आहे आणि उमेदवारास वाटत असलेल्या योग्य/अचूक पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचा आहे. उमेदवाराने क्लिक केलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास उमेदवाराचे त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. उमेदवाराने दर्शविलेल्या चुकीच्या उत्तरासाठी दंड असेल. आपल्याकडून चुकीचे उत्तर दिल्या गेलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी त्या प्रश्नासाठी निर्धारित केलेल्या गुणांच्या एक चतुर्थांश गुण दंडस्वरूप कमी केले जातील.**

**कृपया नोंद असू द्या की या पुस्तिकेत दिलेले प्रश्नांचे प्रकार हे केवळ उदाहरणादाखल आहेत आणि सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष परीक्षेत तुम्हाला यापैकी काही किंवा सर्व प्रकारांचे अधिक काठीण्य पातळीचे प्रश्न आढळतील, शिवाय या ठिकाणी नमूद नसलेल्या इतर प्रकारांवरही प्रश्न आढळतील.**

नमुन्यादाखल काही प्रश्न खाली दिले आहेत.

## नमुना प्रश्न

## मराठी

**प्र.1-2.** पुढील प्रत्येक प्रश्नात वाक्याचे चार भाग पाडले आहेत. व्याकरणाच्या, वाक्य रचनेच्या किवा भाषेच्या दृष्टीने वाक्य सदोष असल्यास, कोणत्या भागात दोष आहे ते ठरवून त्या भागाचा क्रमांक उत्तर म्हणून द्या. वाक्य निर्दोष / बिनचूक असल्यास उत्तर "(5)" द्या.

**प्र.1.** इंग्लंडमधून जन्मलेल्या (1) / कुसुमाग्रजांना शेक्सपियर म्हणतात (2) / व हिंदुस्थानात जन्मलेल्या शेक्सपियरांना (3) / कुसुमाग्रज म्हणतात (4) निर्दोष (5)

**प्र.2.** माझ्या स्मरणशक्तीनुसार (1) / माझ्या बाळपणी माझ्या वडिलांची बदली (2) / एका गलिच्छ गावी (3) / झाली आहे. (4) निर्दोष (5)

**प्र.3-4.** पुढे काही शब्दसमूह दिले आहेत. त्याला समानार्थी असणारा एक शब्द दिलेल्या पर्यायातून निवडा.

**प्र.3.** स्वतःच स्वतःची सर्व कामे करणारा.

(1) स्वयंभू (2) स्वावलंबी (3) स्वयंचलित (4) स्वकष्टार्जित (5) स्वाध्यायी

**प्र.4.** कोणतेही काम करू शकणारा.

(1) बहुश्रुत (2) हुषार (3) चलाख (4) हरहुन्नरी (5) डोकेबाज

## इंग्रजी

**Q.1.** Read the sentence to find out whether there is any grammatical or idiomatic error in it. The error, if any, will be in one part of the sentence. That part is the answer. If there is no error, the answer is 'No error'. (Ignore the errors of punctuation, if any).

The regaining of freedom / as we well know has given rise for / many dormant issues / and conflicts in our society. No error
(1) (2) (3) (4) (5)

**Q.2.** **Directions :** In each of the following questions, select from amongst the five alternatives, the word most opposite in meaning of the word given in capitals.

INADVERTENT
(1) adequate (2) available (3) sluggish (4) negligent (5) intentional

**Q.3.** Pick out from the words given below this sentence the word which would complete the sentence correctly and meaningfully.

He wants me to look ____ his garden during his absence.
(1) at (2) over (3) after (4) into (5) from

**Q.4.** **Direction :** In each of the following questions, select from amongst the five alternatives, the word nearest in meaning to the word given in capitals.

LETHAL (1) light (2) dangerous (3) deadly (4) cruel (5) thoughtless

## सामान्य ज्ञान

**प्र.1.** कोणत्या देशाने क्रिकेट - विश्वचषक 2007 जिंकला ?
(1) दक्षिण आफ्रिका (2) श्रीलंका (3) इंग्लंड (4) न्यूझिलंड (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.2.** महाराष्ट्रात खालील पैकी कोणते पीक घेतले जात नाही ?
(1) ज्वारी (2) गहू (3) ज्यूट (4) कापूस (5) तंबाखू

**प्र.3.** महाराष्ट्रात खालीलपैकी कोणत्या शहरात कुंभमेळा भरतो ?
(1) पुणे (2) रत्नागिरी (3) नाशिक (4) पंढरपूर (5) कोल्हापूर

**प्र.4.** खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमारेषा महाराष्ट्राच्या सीमारेषेशी लागून नाही ?
(1) छत्तीसगड (2) कर्नाटक (3) आंध्र प्रदेश (4) राजस्थान (5) गुजरात

## बौद्धिक चाचणी

**प्र.1.** 'पायाचा', मनुष्याशी जो संबंध आहे तसाच संबंध 'खूर' चा खालीलपैकी कशाशी आहे ?
(1) घोडा (2) कुत्रा (3) बूट (4) लोहार (5) खोगीर

**प्र.2.** मुलांच्या एका रांगेत महेश रांगेच्या डावीकडून सातवा आणि उजवीकडून अठरावा आहे. त्या रांगेत एकूण किती मुले आहेत?
(1) 26 (2) 25 (3) 27 (4) निश्चित सांगता येत नाही (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरीक्त अन्य

**प्र.3.** खालील इंग्रजी वर्णाक्षरगटाच्या श्रृंखले मध्ये प्रश्नचिह्नाच्या (?) जागी दिलेल्या इंग्रजी वर्णाक्षरगटांपैकी कोणता गट येईल ?
AB BC CD DE ? FG
(1) DF (2) DG (3) FE (4) EF (5) GF

**प्र.4.** एका सांकेतिक परिभाषेत 'A + B' चा अर्थ 'B ची आई A आहे ' असा आहे आणि 'A – B' चा अर्थ 'B चे वडील A आहेत' असा आहे. खालीलपैकी कशाचा अर्थ 'R ची आजी P आहे ' असा होईल ?
(1) P – Q + R (2) Q – R + P (3) P + Q – R (4) Q + R – P (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरीक्त अन्य

## तांत्रिक ज्ञान

ह्या प्रश्नावलीचे प्रश्न संबंधित कार्यक्षेत्राच्या ज्ञानावर आधारित असतील.

**(अ) ऑनलाईन परीक्षेच्या स्वरूपाबद्दलचे तपशील:**

(1) परीक्षा ऑनलाईन म्हणजेच संगणकावर घेतली जाईल.

(2) सामान्य ज्ञान, बौद्धिक चाचणी आणि विषय ज्ञानाच्या प्रश्नावल्या मराठी आणि इंग्रजी भाषेत असतील. इंग्रजी भाषा, तांत्रिक ज्ञानांची प्रश्नावली इंग्रजी भाषेत तर मराठी भाषेची प्रश्नावली मराठी भाषेत उपलब्ध करून दिली जाईल.

(3) सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या **पाच** उत्तरांपैकी केवळ एकच अचूक उत्तर असेल. **परीक्षार्थीला सर्वाधिक उचित उत्तराची निवड करावयाची असून जो पर्याय उचित/ अचूक वाटतोय त्या पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचे आहे. 'क्लिक' केला गेलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. एखादया प्रश्नाच्या उत्तरास अंतिम मुल्यांकनासाठी तेव्हाच विचारात घेतले जाईल जेव्हा उमेदवाराने 'Save & Next' वर किंवा 'Mark for Review & Next' वर क्लिक करुन उत्तर दिले असेल.**

(4) सर्वर मध्ये घडयाळ लावलेले आहे आणि तुमच्या संगणक पटलाच्या वरच्या उजव्या कोप-यातील ऊर्वरीत वेळ दर्शविणारा टाईमर परीक्षा पूर्ण करण्यासाठी शिल्लक राहिलेली वेळ दर्शवेल. जेव्हा घड्याळात दर्शविलेली वेळ संपेल तेव्हा परीक्षा आपोआप बंद होईल. तुम्हाला स्वतःहून परीक्षा संपवण्याची किंवा थांबवण्याची आवश्यकता नाही.

(5) स्क्रीनच्या उजव्या बाजूला Question पॅलेट दाखवले जाणार असून ते खालील पैकी एक चिन्ह वापरुन प्रत्येक प्रश्नाची स्थिती दाखवेल :



**तुम्ही अजून ह्या प्रश्नापर्यंत पोहोचला नाहीत.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शवले नाही.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले नाही, परंतु ह्या प्रश्नाच्या पडताळणीसाठी खूण केली आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे, परंतु पडताळणीसाठी त्यावर खूण केली आहे.**

'पडताळणीसाठी खूण केल्याची' स्थिती निव्वळ ह्याचे स्मरण देते की तुम्ही हा प्रश्न पुन्हा पाहण्याचे ठरवले आहे. जर पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले गेलेले असेल तर अंतिम मुल्यांकनामध्ये ते उत्तर गृहित धरले जाईल.

(6) उत्तर दर्शवण्यासाठी प्रश्न निवडायचा असल्यास आपण खालीलपैकी एक करू शकता :

(a) थेट त्या क्रमांकाच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी पटलाच्या उजवीकडील प्रश्न तालिकेमध्ये त्या क्रमांकाच्या प्रश्नावर क्लिक करा. कृपया लक्षात राहू द्या की हा पर्याय निवडल्यास तुमचे चालू प्रश्नाला दर्शविलेले उत्तर सुरक्षित केले जात **नाही.**

(b) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी 'Save and Next' वर क्लिक करा आणि क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(c) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करुन पडताळणीसाठी खूण करण्यासाठी 'Mark for Review and Next' वर क्लिक करा क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(7) तुमचे उत्तर निवडण्यासाठी दिलेल्या पर्याय बटनांपैकी एका पर्याय बटनावर क्लिक करा.

(8) तुमचे उत्तर बदलण्यासाठी दुस-या अपेक्षित पर्याय बटनावर क्लिक करा.

(9) तुमचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी तुम्हाला **'Save and Next'** वर क्लिक **करावेच** लागेल.

(10) निवडलेले उत्तर रद्द करण्यासाठी त्या निवडलेल्या पर्यायावर पुन्हा क्लिक करा किवा **'Clear Response'** बटनावर क्लिक करा.

(11) एखादया प्रश्नावर पडताळणीसाठी खूण करावयाची असल्यास **'Mark for Review & Next'** वर क्लिक करा. जर पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर ते उत्तर अंतिम मूल्यांकनामध्ये ग्राह्य धरले जाईल.

(12) एखादया प्रश्नाचे उत्तर बदलण्यासाठी प्रथम तो प्रश्न निवडा, त्यानंतर नवीन उत्तर पर्यायावर क्लिक करा आणि नंतर **'Save and Next'** बटनावर क्लिक करा.

**(13) उत्तर दर्शवल्यानंतर सुरक्षित केलेले प्रश्न किंवा पडताळणीसाठी खूण केलेले प्रश्नच केवळ मुल्यांकनासाठी विचारात घेतले जातील.**

(14) ह्या प्रश्नपत्रिकेमधील विभाग हे पटलाच्या (screen) वरच्या पट्टिकेवर (bar) दर्शवले आहेत. एखादया विभागातील प्रश्न त्या विभागाच्या नावावर क्लिक करून पाहता येतील. तुम्ही जो विभाग पाहत आहात तो ठळकपणे दर्शविला जाईल.

(15) एखादया विभागातील अंतिम प्रश्नासाठी **'Save and Next'** बटनावर क्लिक केल्यानंतर आपण आपोआप पुढच्या विभागाच्या पहिल्या प्रश्नाकडे जाल.

(16) एखादया विभागातील प्रश्नांची स्थिती पाहण्यासाठी आपण माऊस कर्सर (mouse cursor) त्या विभागाच्या नावावर नेऊ शकता.

(17) तुमच्या सोईनुसार तुम्ही परीक्षेच्या कालावधीत केव्हाही विभाग आणि त्यांतील प्रश्नांकडे जाऊ-येऊ शकता.

(18) परीक्षार्थींना 'परीक्षा प्रशासकाच्या' सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची विनंती आहे. जर एखादा परीक्षार्थी सूचनांचे/नियमांचे पालन करीत नसेल, तर तो गैरवर्तणुकीचा/अप्रामाणिक मार्गाच्या अंगिकाराचा प्रकार गणला जाईल आणि असा परीक्षार्थी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ठरविलेल्या कालावधीसाठी परीक्षांना बसण्यास अपात्र ठरला जाईल.

(19) केवळ परीक्षा प्रारंभ होण्यापूर्वी परीक्षार्थी परीक्षा प्रशासकांना त्यांच्या शंका किंवा प्रश्न विचारू शकतात. परीक्षा प्रारंभ झाल्यानंतर कोणत्याही शंकेचे निरसन केले जाणार नाही.

(20) परीक्षेची 75/120 मिनिटे संपल्यानंतर परीक्षार्थींना एकही प्रश्न सोडवता येणार नाही किंवा त्यांच्या उत्तरांची पडताळणी करता येणार नाही. जरी परीक्षार्थीने अंतिम 'submit' बटन क्लिक केले नसले तरीही त्याच्या/तिच्या उत्तरांना संगणक प्रणाली आपोआप सुरक्षित (save) करेल.

(21) **कृपया लक्षात घ्या-**

**(1) प्रत्यक्ष परिक्षेची वेळ संपल्याशिवाय परीक्षार्थींना पेपर 'अंतिमतः सबमिट' (finally submit) करू दिले जाणार नाही.**

**(2) एकदा परीक्षा प्रारंभ झाली की कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थ्याने की-बोर्ड ची कोणतीही key क्लिक करावयाची नाही, कारण त्यामुळे परीक्षा बंद होईल.**

**(ब) सर्वसामान्य सूचना**

(1) कृपया प्रवेशपत्रावर दर्शविलेले दिनांक, रिपोर्टिंग वेळ आणि परीक्षास्थळाचा पत्ता याची नीट दखल घ्या.

(2) तुम्ही ऑनलाईन परीक्षेच्या स्थानाची निश्चिती करण्यासाठी एक दिवस अगोदर परीक्षास्थानी जावे, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी तुम्ही तिथे (प्रवेश पत्रावर छापलेल्या) वेळेवर पोहोचू शकाल. उशीरा येणा-यांना प्रवेश नाही.

(3) तुमचा नवीनतम फोटोग्राफ चिकटवलेले प्रवेशपत्र तुम्हाला परीक्षा स्थानी आणावयाचे आहे. (प्रवेशपत्रावर शक्यतो तोच फोटो असावा जो तुम्ही अपलोड केला आहे)

(4) परीक्षा स्थानी तुम्हाला परीक्षा प्रशासक आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे प्रतिनिधि यांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. सूचनांचे उल्लंघन केले गेल्यास तुम्हाला अपात्र गणले जाईल आणि परीक्षास्थान सोडून जाण्यास सांगितले जाईल.

(5) गणकयंत्र (स्वतंत्र किंवा घडयाळासह), पुस्तके, वह्या किंवा लिखित कागद, सेलफोन (कॅमेरा सुविधेसह/शिवाय) किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र (उपकरण) यांचा वापर परीक्षेच्या कालावधीत करू दिला जाणार नाही.

(6) कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले प्रवेशपत्र आणि सध्या वैध, मूळ स्वरुपातील फोटो ओळख पत्र (जसे की, पॅन कार्ड/पारपत्र/वाहन चालक परवाना/फोटोसहित मतदान पत्र/गॅझेटेड अधिका-याच्या किंवा लोकप्रतिनिधिच्या सहीचे अस्सल लेटरहेडवरील फोटो ओळख पत्र/मान्यता प्राप्त महाविद्यालयाने/विश्वविद्यालयाने दिलेले ओळख पत्र (चालू वर्षासाठी स्विकारण्यायोग्य)/फोटोसहित आधारकार्ड/कर्मचारी ओळख पत्र) आणावे. आवेदन पत्रावर असणारे नाव (ऑनलाइन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असते) फोटो-ओळख पत्रावरील नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी ह्याची खास दखल घ्यावी. जर आवेदन पत्रावरील आणि फोटो-परिचय पत्रावरील नावात काहीही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. **कृपया लक्षात घ्या - रेशन कार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.** ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसूचना/विवाह प्रमाणपत्र/शपथपत्र सादर केले तरच त्यांना परिक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

(7) बायोमेट्रिक डाटा (अंगठ्याचा ठसा) आणि फोटो परीक्षेच्या ठिकाणी दोन वेळा घेतला जाईल (परीक्षेच्या सुरवातीस आणि परीक्षा संपल्यावर). बायोमेट्रिक डाटा च्या सत्यता पडताळणीचा अंतिम निर्णय (जुळतो अथवा जुळत नाही) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा असेल व उमेदवारांना बंधनकारक असेल. बायोमैट्रिक डाटा परीक्षा दरम्यान कधीही घेण्यास/सत्यता पडताळणीस विरोध केल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. या संदर्भात खालील मुद्दे लक्षात घ्या :

(क) जर बोटांवर कसलाही थर असेल (शाई/मेहंदी/रंग इत्यादी) तर धुवून टाका आणि परिक्षेच्या दिवसाआधी तो थर संपूर्णपणे गेला आहे याची खात्री करून घ्या.

(ख) जर बोटांना मळ किंवा धूळ लागली असेल तर बोटांचे ठसे (Finger prints) घेण्याआधी धुवून घ्या आणि हातांची बोटं सुकली आहेत याची खात्री करून घ्या.

(ग) दोन्ही हातांची बोट सुकलेली आहेत याची खात्री करा आणि जर बोट ओलसर असतील तर प्रत्येक बोट पूसा.

(घ) ठसा घेतल्या जाणा-या अंगठ्याला जर जखम/मार लागला असेल तर त्वरित परिक्षा केंद्रावर संबंधित अधिका-यास कळवा.
(या मुद्यांचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.)

(8) फ्रिस्किंगमध्ये वेळ वाचविण्यासाठी (मेटल डिटेक्टरचा वापर केला जाईल) उमेदवारांना खालील ड्रेस कोडचे पालन करण्याचा सल्ला दिला जात आहे:

- हलके कपडे जे कोणतीही साधने किंवा संपर्काची उपकरणे लपविण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही.
- अर्धी बाही असलेले कपडे पण त्यावर कोणतीही मोठी बटणे, बॅजेस, ब्रुचेस इ. नसावीत ज्यांचा वापर संपर्क साधन, ब्लूटूथ, कॅमेरा इ. लपविण्यासाठी केला जाऊ शकेल.
- स्लीपर/सँडल वापरावे आणि बूट/मोजे टाळावे.

पारंपारिक/धार्मिक पोशाख घालून येणा-या उमेदवारांनी आणि दिव्यांग उमेदवारांनी फ्रिस्किंग साठी रिपोर्टिंगच्या वेळेपूर्वी अगोदरच केंद्रावर उपस्थित व्हावे.

(9) तुम्ही दिलेल्या उत्तरांचे उत्तरांच्या सारखेपणासाठी इतर परीक्षार्थ्यांच्या उत्तरांबरोबर विश्लेषण केले जाईल. यासाठी अवलंब केलेल्या विश्लेषण प्रक्रियेतून जर उत्तरांची अदलाबदल केल्याचा व तुम्ही प्राप्त केलेले गुण वैध नसल्याचा निष्कर्ष आल्यास तुमची उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. कोणीही परीक्षार्थी जर कॉपी करताना, सहाय्य घेताना किंवा देताना, किंवा परीक्षार्थ्यास न शोभणारी गैरवर्तणूक करताना आढळला तर त्याच्या/तिच्या उत्तरांची तपासणी केली जाणार नाही. महानगरपालिका अशा परीक्षार्थी विरूद्ध योग्य ती कारवाई करेल.

(10) तुम्ही स्वतः सोबत एक बॉल पॉईंट पेन आणावे. कच्चे काम करण्यासाठी कागद पुरविले जातील. तुम्ही स्वतःसोबत एक स्टँप इंक पॅड आणू शकता. एक कागद तुम्हाला दिला जाईल ज्यावर तुम्ही कच्चे काम करू शकता किंवा उत्तर निवडण्यापूर्वी पुन्हा एकदा पडताळणी करावयाच्या प्रश्नांचे क्रमांक लिहू शकता. परीक्षा संपल्यावर कच्चे काम केलेले कागद प्रवेशपत्रासह पर्यवेक्षकाकडे हस्तांतरित करावीत.

(11) परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णतः नाकारण्यात येणार नाही; ज्याचा परिणाम चाचणी वितरणावर आणि/किंवा निकाल तयार करण्यावर होऊ शकतो. अशा प्रसंगी असा व्यत्यय सुधारण्याचा पूर्णतः प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुस-या जागेत हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित आहे. पुन्हा परीक्षा घेणे या बाबतचा निर्णय हा परीक्षा घेणा-या संस्थेचा/मंडळाचा निर्णय अंतिम असेल. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करु शकणार नाही. ह्या विलंब झालेल्या प्रक्रीयेस उमेदवार जर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधून संपूर्णपणे वगळण्यात येईल.

(12) परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागांमधे उघड करणे, प्रकाशित करणे, पुन्हाः निर्माण करणे, ट्रांसमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षा केंद्रामधे दिला जाणारा कागद घेऊन जाणारे किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर बाळगण्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(13) भरती करण्याच्या कोणत्याही प्रक्रियेतील कोणत्याही भागामधे, परिक्षार्थी द्वारा खोटी माहिती देणे/किंवा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लंघन करण्याबाबतीत, परिक्षार्थीस भरती प्रक्रियेमधे अपात्र घोषित केले जाईल आणि भविष्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कोणत्याही भरती प्रक्रियेमध्ये भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. जर ह्या बाबतीत चालू असलेल्या प्रक्रियेमध्ये निदर्शनास आले नाही परंतु नंतर कधी लक्षात आल्यास त्याला प्रक्रियेच्या पहिल्या भागापासूनच अपात्र ठरविण्यात येईल.

(14) कृपया नोंद घ्यावी की कोणताही उमेदवार परीक्षेसाठी एकाच वेळी उपस्थित राहू शकतो/ते. एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास उमेदवारांना प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेल्या दिवशी व वेळी एकदाच परीक्षेस उपस्थित राहण्याचा सल्ला दिला जातो. उर्वरीत सर्व प्रवेशपत्रे उमेदवारांना परत करावी लागतील. एकापेक्षा अधिक वेळा परीक्षा दिल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

(15) उमेदवारांना सल्ला दिला जातो की त्यांनी “The Public Examinations (Prevention of Unfair Means) Act, 2024” ची नोंद घ्यावी.

**आपणांस शुभेच्छा !**